| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | : | ३१.१०.२०२३ |
| नोंदणी दिनांक | : | ३१.१०.२०२३ |
| निकाल दिनांक | : | ११.०३.२०२६ |
| कालावधी | : | ०२व.०४म.११दि. |

**अकोले येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालयात**
**तालुका – अकोले, जिल्हा – अहमदनगर**
**( पीठासीन अधिकारी धिरज मा. हिंग्लजकर )**
न्यायनिर्णय घोषित दिनांक : ११ मार्च, २०२६

**नियमित फौजदारी खटला क्र.२१४/२०२३** **निशाणी क्र.२१**
गुन्हा नोंद क्र.१३०/२०२३, अकोले पोलीस ठाणे, अकोले,

| | | |
|---|---|---|
| **अभियोग पक्ष** | | **महाराष्ट्र शासन**,<br>मार्फत – पोलीस निरीक्षक,<br>अकोले पोलीस ठाणे, अकोले,<br>ता.अकोले, जि.अहमदनगर. |
| प्रतिनिधीत्व | : | सहाय्यक सरकारी वकील श्रीमती के.आर.उतळे. |
| **आरोपी** | | **विष्णु गंगाधर कोकाटे**,<br>वय वर्षे ५०,<br>रा.वाशेरे,<br>ता.अकोले, जि.अहमदनगर. |
| प्रतिनिधीत्व | : | विधीज्ञ श्री.टी.एस.फापाळे. |

**भाग–ब**

(फौजदारी आदेशिकेचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(ii) अन्वये)

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :– | ०१.०३.२०२३ |
| फिर्याद दाखल दिनांक | :– | ०१.०३.२०२३ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :– | ३१.१०.२०२३ |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | :– | १३.०६.२०२४ |

| | | |
|---|---|---|
| पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | :– | ०९.०३.२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :– | ११.०३.२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | :– | ११.०३.२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :– | -- |

**<u>आरोपीची माहिती</u>**

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्ह्याचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं.कलम ४२८ अन्वये समायोजित (set off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | विष्णु गंगाधर कोकाटे | आरोपीला अटक केलेली नाही. आरोपीला दिनांक ०३.०३.२०२३ रोजी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४१अ नुसार नोटीस देण्यात आली आहे. | १३.०६.२०२४ | भारतीय दंड विधान संहिता, १८६० चे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, २०१ अन्वये. | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

# <u>न्यायनिर्णय</u>

## (<u>पारित दिनांक ११.०३.२०२६</u>)

**१.** आरोपीविरुध्द अकोले पोलीस ठाणे गु.र.क्र.१३०/२०२३, भारतीय दंड विधान संहिता, १८६० चे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, २०१ खालील गुन्हयांसाठी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे प्रकरण १९ अन्वये वॉरंट खटल्याप्रमाणे संपरिक्षा घेण्यात आली.

**२.** **<u>अभियोग पक्षाची थोडक्यात हकीगत अशी की</u>**,

दिनांक ०१.०३.२०२३ रोजी दुपारी ०३.०० वाजताचे सुमारास

फिर्यादी दामू शंकर जाधव हे त्यांचे शेत सर्व्हे नं.३९/१ मध्ये काम करीत असताना त्यांचे शेजारी शेत असलेला आरोपी विष्णू गंगाधर कोकाटे हा तेथे आला. फिर्यादी हे आरोपीला "माझ्या विहिरीच्या शेजारी असलेली तुझी बांधावरची झाडे काढून घे, सदर झाडांची पाने माझ्या विहिरीत पडून पाणी खराब होत आहे," असे समजावून सांगत असताना त्याचा त्याला राग आल्याने त्याने जमिनीवर पडलेला दगड उचलून तो दगड हातात धरून त्यांच्या कपाळाच्या डाव्या बाजूस, नाकावर, डाव्या हाताच्या अंगठ्यावर व डाव्या पायाच्या मांडीवर मारून दुखापत केली आणि त्यांना वाईट भाषेत शिवीगाळ करून "तुला या नंतर सोडणार नाही," अशी धमकी देवून तेथून निघून गेला. त्यानंतर फिर्यादी हे घरी गेले व त्यांनी घडलेला प्रकार त्यांची पत्नी मिराबाई दामोधर जाधव हिला सांगितला. त्यानंतर फिर्यादी यांनी अकोले पोलीस ठाणे येथे जावून आरोपीविरुध्द घडलेल्या घटनेबाबत फिर्याद दाखल केली.

३. फिर्यादीप्रमाणे आरोपी यांचेविरुध्द गुन्हा रजिस्टर क्र.१३०/२०२३ नोंदविण्यात आला. तपासिक अंमलदार पोलीस नाईक श्री.राम मनोहर लहामगे यांनी या गुन्ह्याचा तपास केला. त्यांनी घटनास्थळी जावून दोन पंचासमक्ष घटनास्थळाचा पंचनामा तयार केला. त्यांनी संबंधित साक्षीदारांची टिपणे नोंदविली. त्यांनी फिर्यादी यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले. त्यांनी तपासकामी आवश्यक असणारी कागदपत्रे हस्तगत केली. तपासाअंती आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळून आल्याने तपासिक अंमलदार श्री.राम मनोहर लहामगे यांनी त्याचे विरुध्द भारतीय दंड विधान संहिता, १८६० चे कलम ३२४, ५०४, ५०६, २०१ अन्वये दोषारोपपत्र दाखल केले.

४. माझे कार्यालयीन पूर्वाधिकारी यांनी आरोपीविरुध्द निशाणी ८ वर फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे प्रकरण १९ अन्वये भारतीय दंड विधान संहिता, १८६० चे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, २०१ अन्वये दोषारोप

नोंदविला. तो दोषारोप आरोपीला वाचून दाखविला. आरोपीने त्याला गुन्हा मान्य व कबूल नसल्याचे कथन केले.

५. अभियोग पक्षाने याकामी परिशिष्ट भाग 'क' मध्ये नमूद केल्याप्रमाणे साक्षीदार क्र.१ फिर्यादी दामू शंकर जाधव यांना तपासले आहे. फिर्यादी यांची आरोपी याचेशी न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याने त्यांनी अभियोग पक्षाला सहाय्य केलेले नाही. त्यामुळे, फिर्यादी यांचे निशाणी २० वरील पुरशिसीनुसार अभियोग पक्षाचा पुरावा बंद करणेत आला.

६. आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळून न आल्याने त्याचे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३१३(१)(ब) अंतर्गत निवेदन नोंदविण्यात आलेले नाही.

७. अभिलेखातील कागदपत्रे वाचली. अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील श्रीमती के.आर.उतळे व आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.टी.एस.फापाळे यांचा युक्तिवाद ऐकला.

८. अभिलेखातील कागदपत्रांचे अवलोकन केले असता आणि अभियोग पक्ष व बचाव पक्ष यांचेतर्फे युक्तिवाद ऐकल्यानंतर या न्यायालयापुढे पुढील मुद्दे उपस्थित झाले आहेत. ते मुद्दे व त्या मुद्दयांवरील कारणमिमांसेसह निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेतः–

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक ०१.०३.२०२३ रोजी दुपारी ०३.०० वाजताचे सुमारास वाशेरे, ता.अकोले, जि.अहमदनगर येथे आरोपीने फिर्यादी दामू शंकर जाधव यांना दगड, की ज्याने मृत्यू होण्याचा संभव आहे, अशा हत्याराने | |

मारहाण करुन त्यांना इच्छापूर्वक किरकोळ दुखापती केल्या, आणि त्याद्वारे आरोपीने भारतीय दंड विधान संहिता, १८६० चे कलम ३२४ अन्वये गुन्हा केला, ही बाब अभियोग पक्षाने शाबीत केली आहे काय ? **....नाही.**

२. वर नमूद दिनांकास, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादी यांना दगडाने मारहाण करुन त्यांना इच्छापूर्वक किरकोळ दुखापती केल्या, आणि त्याद्वारे आरोपीने भारतीय दंड विधान संहिता, १८६० चे कलम ३२३ अन्वये गुन्हा केला, ही बाब अभियोग पक्षाने शाबीत केली आहे काय ? **....नाही.**

३. वर नमूद दिनांकास, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादी यांना शिवीगाळ करुन त्यांचा उद्देशपूर्वक अपमान करुन त्यांचेकडून सार्वजनिक शांततेचा भंग होईल, किंवा अपराध घडेल अशा प्रकारे त्यांना प्रक्षोभित केले, आणि त्याद्वारे आरोपीने भारतीय दंड विधान संहिता, १८६० चे कलम ५०४ अन्वये गुन्हा केला, ही बाब अभियोग पक्षाने शाबीत केली आहे काय ? **....नाही.**

४. वर नमूद दिनांकास, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादी यांना जीवे मारण्याची धमकी दिली व त्यांना फौजदारीपात्र धाकदपटशा केली, आणि त्याद्वारे

| | | |
|---|---|---|
| | आरोपीने भारतीय दंड विधान संहिता, १८६० चे कलम ५०६ अन्वये गुन्हा केला, ही बाब अभियोग पक्षाने शाबीत केली आहे काय ? | **....नाही.** |
| ५. | वर नमूद दिनांकास, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याचेकडून गुन्हा घडला आहे, हे माहित असून किंवा तसे समजण्यास कारण असून स्वत:ला वैध शिक्षेपासून वाचवण्याच्या उद्देशाने गुन्हा करतेवेळी वापरलेला दगड हे हत्यार नाहीसे केले, आणि त्याद्वारे आरोपीने भारतीय दंड विधान संहिता, १८६० चे कलम २०१ अन्वये गुन्हा केला, ही बाब अभियोग पक्षाने शाबीत केली आहे काय ? | **....नाही.** |
| ६. | अंतिम आदेश काय ? | **...आरोपीला निर्दोष मुक्त करणेत येत आहे.** |

<u>**कारणमीमांसा**</u>

<u>**मुद्दा क्र.१ ते ५ बाबतः**</u>–

**९.** हे मुद्दे एकाच घटनेशी संबंधित असल्याने या मुद्यांची चर्चा एकत्रित करीत आहे.

**१०.** अभियोग पक्ष कथन करतो त्याप्रमाणे दिनांक ०१.०३.२०२३ रोजी दुपारी ०३.०० वाजताचे सुमारास वाशेरे, ता.अकोले, जि.अहमदनगर येथे आरोपीने फिर्यादी दामू शंकर जाधव यांना दगड, की ज्याने मृत्यू होण्याचा संभव आहे, अशा हत्याराने मारहाण करुन त्यांना इच्छापूर्वक किरकोळ दुखापती केल्या, आणि त्यांना शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली व स्वत:ला वैध शिक्षेपासून वाचवण्याच्या उद्देशाने गुन्हा करतेवेळी वापरलेला दगड हे हत्यार नाहीसे केले, आणि त्याद्वारे आरोपीने भारतीय दंड विधान संहिता, १८६० चे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, २०१ अन्वये गुन्हा केला, ही बाब अभियोग पक्षाने शाबीत केली आहे किंवा कसे, हे पडताळण्यासाठी अभियोग पक्षाने सादर केलेल्या पुराव्याचे अवलोकन होणे आवश्यक आहे.

**११.** अभिलेखातील कागदपत्रांचे अवलोकन केले असता फिर्यादी यांनी याकामी निशाणी १६ वर अर्ज दाखल करुन हे प्रकरण त्यांचे दरम्यान आपसांत तडजोडीने मिटविण्याची परवानगी मागितली होती. परंतु, भारतीय दंड विधान संहिता, १८६० चे कलम ३२४ खालील गुन्हा अतडजोडपात्र असल्याने त्यांचा अर्ज नामंजूर करण्यात आला व हे प्रकरण पुढे सुरू ठेवण्यात आले.

**१२.** अभियोग पक्षाने फिर्यादी दामू शंकर जाधव यांना निशाणी पी–१८ वर साक्षीदार क्र.१ म्हणून तपासले आहे. साक्षीदार क्र.१ यांनी त्यांचे जबानीमध्ये कथन केले आहे की, दिनांक ०१.०३.२०२३ रोजी त्यांचे व आरोपीमध्ये किरकोळ बाचाबाची झाली होती. त्या व्यतिरिक्त त्यांचे दरम्यान काहीही घडलेले नाही. त्यांनी रागाच्या भरात आरोपीविरुध्द अकोले पोलीस ठाणे येथे फिर्याद दाखल केली होती. त्यांनी फिर्यादीवरील निशाणी पी–१९ वरील त्यांची सही ओळखली आहे. परंतु, त्या फिर्यादीतील मजकूर त्यांनी सांगितलेला नाही व फिर्यादीतील मजकूर त्यांना माहित नाही, अशी त्यांनी कथने केली आहेत.

**१३.** साक्षीदार क्र.१ फिर्यादी दामू शंकर जाधव यांनी त्यांचे जबानीमध्ये केलेल्या कथनांचे अवलोकन केले असता त्यांनी अभियोग पक्षाला मुख्य घटनेबाबत सहाय्य केलेले नाही, असे दिसून येते. सहाय्यक सरकारी वकील श्रीमती के.आर.उतळे यांनी या साक्षीदाराला उलटतपासात विचारतात त्या स्वरुपाचे प्रश्न विचारुन देखील या साक्षीदाराचे जबानीतून अभियोग पक्षाला सहाय्य होईल, असे कोणतेही कथन अभिलेखावर आलेले नाही. या तपासणीमध्ये फिर्यादी यांनी त्यांची आरोपी याचेशी न्यायालयाबाहेर तडजोड झाली आहे, ही बाब मान्य केली आहे. त्यामुळे, फिर्यादी यांनी अभियोग पक्षाला सहाय्य केले नसल्याचे दिसून येते. मूळ फिर्यादी यांनी अभियोग पक्षाला सहाय्य न केलेने याकामी अन्य साक्षीदारांना तपासलेले नाही. त्यामुळे, अभियोग पक्ष कथन करतो ती घटना शाबीत झालेली नाही.

**१४.** अभियोग पक्षाने याकामी पंच साक्षीदारांना तपासले नसल्याने याकामी घटनास्थळाचा पंचनामा शाबीत झालेला नाही. फिर्यादी यांनी अभियोग पक्षाला सहाय्य न केल्याने याकामी संबंधित वैद्यकीय अधिकारी यांना तपासलेले नाही. त्यामुळे, फिर्यादी यांना या घटनेमध्ये दुखापती झाल्या होत्या, ही बाब शाबीत झालेली नाही.

**१५.** अभिलेखातील एकंदरीत पुराव्यावरुन अभियोग पक्ष कथन करतो त्याप्रमाणे दिनांक ०१.०३.२०२३ रोजी दुपारी ०३.०० वाजताचे सुमारास वाशेरे, ता.अकोले, जि.अहमदनगर येथे आरोपीने फिर्यादी दामू शंकर जाधव यांना दगड, की ज्याने मृत्यू होण्याचा संभव आहे, अशा हत्याराने मारहाण करुन त्यांना इच्छापूर्वक किरकोळ दुखापती केल्या, आणि त्यांना शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली व स्वत:ला वैध शिक्षेपासून वाचवण्याच्या उद्देशाने गुन्हा करतेवेळी वापरलेला दगड हे हत्यार नाहीसे केले, ही घटना शाबीत होत नाही. त्यामुळे, आरोपी यांनी भारतीय दंड

विधान संहिता, १८६० चे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, २०१ अन्वये गुन्हा केला आहे, असे अनुमान काढता येणार नाही. सबब, मी मुद्दा क्र.१ ते ४ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र.६ बाबतः</u>–**

**१६.** वर मुद्दा क्र.१ ते ५ बाबत केलेल्या विवेचनांवरुन आरोपीविरुध्द दोषारोप संशयापलीकडे शाबीत होत नाहीत. त्यामुळे, आरोपीला भारतीय दंड विधान संहिता, १८६० चे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, २०१ खालील गुन्ह्यांतून निर्दोष मुक्त करणे योग्य व न्यायोचित होईल. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहे:–

**<u>आदेश</u>**

**१.** आरोपीला भारतीय दंड विधान संहिता, १८६० चे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, २०१ ह्या गुन्हयांतून फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्त करणेत येत आहे.

**२.** आरोपीचा पूर्वीचा वैयक्तिक जातमुचलका रद्द करणेत येत आहे.

**३.** आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७अ अन्वये रक्कम रू.१५,०००/– चा वैयक्तिक जातमुचलका व तितक्याच रक्कमेचे जामीन बंधपत्र द्यावे.

– ( खुल्या न्यायालयात घोषित )

DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Digitally signed by DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Date: 2026.03.16 16:53:09 +0530

**दिनांक : ११.०३.२०२६** **(धिरज मा.हिंग्लजकर)**
**ठिकाण : अकोले** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,अकोले,**
**ता.अकोले, जि.अहमदनगर.**

## भाग–क

(फौजदारी आदेशिकेचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(iii) अन्वये)
अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालय यांचेतर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांची यादी

**अ. अभियोग पक्ष**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नाव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | दामू शंकर जाधव | फिर्यादी | निशाणी पी–१८ |

**ब. बचाव पक्षाचे साक्षीदार, असल्यास :**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नाव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| निरंक | | | |

**क. न्यायालयीन साक्षीदार, असल्यास :**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नाव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| निरंक | | | |

अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालय यांचेतर्फे निशाणी देण्यात आलेल्या कागदपत्रांची यादी
**अ. अभियोग पक्ष**

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | निशाणी पी–१९/साक्षीदार क्र.१ | फिर्यादीवरील सही. |

**ब. बचाव पक्ष :**

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | | |

क. न्यायालयीन निशाणी :

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | | |

ड. मुद्देमाल वस्तूंचा तपशील :

| अ.क्र. | मुद्देमाल वस्तुचा क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | | |

DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Digitally signed by DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Date: 2026.03.16 16:53:17 +0530

दिनांक : ११.०३.२०२६
ठिकाण : अकोले

(धिरज मा.हिंग्लजकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,अकोले,
ता.अकोले, जि.अहमदनगर.

**Certificate**

I affirm that the contents of this PDF file are word to word as per original judgment/order.

Sd/-
(Amol U. Salpe)
Stenographer (Grade-3)
Jt.Civil Court Junior Division
Akole

| | | |
|---|---|---|
| Dictated on | : | 11.03.2026 |
| Transcribed on | : | 11.03.2026 |
| Checked and signed on | : | 16.03.2026 |